विकिपीडियात पान टाकणे

वरील marathi_village_wikipedia_article.txt फाइल वापरून मराठी विकिपीडियात लेख चढविण्याचे टप्पे:

1. mr.wikipedia.org उघडा

2. प्रथमच लेख चढवत असाल तर आपले नाव नोंदवा म्हणजे रजिस्टर करा. तुमचे नाव रजिस्टर असल्या शिवाय तुम्हाला लेख चढविता येणार नाही. तुम्ही जुने वापरकर्ते असाल तर लॉग इन करा.

3. ‘शोधा’ बॉक्समध्ये तुम्हाला हव्या असलेल्या गावाचे नाव टाका.

4. तुमच्या गावासाठीचा लेख विकिपीडियावर नसेल तर तुम्हाला तुमच्या गावासाठी लेख लिहायला विकीपीडिया सांगेल (नाव लाल रंगात दाखवले असेल). त्यावर क्लिक करा. दोन बॉक्स दिसतील. त्यात डाव्या बाजूच्या बॉक्स
मध्ये तुम्ही लिहू शकता अथवा मजकूर पेस्ट करू शकता. उजवी कडील बॉक्समध्ये प्रत्यक्ष विकी पानावर लेख कसा दिसेल ते बघायला मिळेल.

5. पूर्वीचा लेख नसल्यास वरील notepad मधील मजकूर या डावीकडील बॉक्स मध्ये पेस्ट करा.

6. अगोदरच या गावाचा लेख कुणी चढविलेला असल्यास तो नीट वाचून त्यात बदल करावयाचा का ते ठरवा. बदल करावयाचा असल्यास ‘स्त्रोत संपादित करा ‘ यावर क्लिक करा.

7. डावी कडील बॉक्समध्ये या अगोदरच्या लेखात हवा असलेला मजकूर ठेऊन अनावश्यक मजकूर काढून टाकू शकता. ज्या महितीला आधार नसेल अशी माहिती विकिपीडियात मान्य होत नाही. अशी माहिती तुम्ही काढावी. आणि वरील नवीन
मजकूर तुम्ही योग्य त्या ठिकाणी पेस्ट करावा.

वरील टप्पा 5 अथवा 7 मध्ये तुम्ही डाव्या बॉक्समध्ये मजकूर टाकल्या टाकल्या उजवा बॉक्स त्वरित 'पूर्वावलोकन' दर्शवेल.

तुम्ही डाव्या चौकटीतील मजकूर संपादित करू शकता उदा. गावांची नावे रोमन लिपीत (इंग्रजीत) असल्यास देवनागरी करा.

एकदा तुम्ही पूर्वावलोकनाबद्दल समाधानी झाल्यावर, तळाशी जा आणि पूर्ण-पृष्ठ पूर्वावलोकन पाहण्यासाठी “ झलक “ दाबा.

झलक पाहून तुम्ही समाधानी असल्यास तुम्ही “ पानाचे प्रकाशन करा “ दाबून विकिपीडियावर पान प्रकाशित करू शकता.

लोकांचे प्रश्न व गावाची वैशिष्ट्ये टाकणे:

या जनगणनेच्या आकडेवारीवर आधारित माहितीत लोकांच्या दृष्टीने महत्वाच्या गोष्टी, त्यांचे आर्थिक-सामाजिक प्रश्न किंवा गैरसोयी तसेच त्या गावाची वैशिष्ट्ये सुटून जातात. तेंव्हा या माहितीची भर देखील यात नंतर टाकता येईल; जसे की त्या गावाचे वैशिष्ठ्य असलेली ऐतिहासिक वास्तू, मंदीर, कुंड, नदी, नदीचा घाट, तलाव, किल्ला, किल्ल्याचा परकोट, एखाद्या थोर पुरुषाने वास्तव्य केलेले घर, कारखाने, खाणी, आलेले महापूर, त्यात झालेली न भरून येणारी हानी, कारखाना वा उत्खनन इत्यादीमुळे होणारे पाण्याचे, जमिनीचे प्रदूषण इत्यादी बाबत माहिती फोटो सहित टाकता येईल. त्यामुळे आज स्थानिक प्रश्न व वैशिष्ट्ये यांच्या नोंदिला कुठेच स्थान मिळत नाही ही जी पोकळी आहे ती भरून निघू शकेल.

अशी माहिती/ प्रसंग टाकण्याबाबत विकिपीडियाचे तीन मुख्य नियम पुढील प्रमाणे आहेत:
• विश्वासार्हता- वाचकांना ती माहिती तपासता आली पाहिजे. वृत्तपत्रे,
नामांकित न्यूज वेबसाईट्स वापराव्यात. शैक्षणिक पुस्तके किंवा शोधनिबंधांचा संदर्भ द्यावा.
• मूळ संशोधन नसावे - स्वतःचे शोध किंवा विचार मांडू नयेत. माहिती आधी
कुठे ना कुठे प्रसिद्ध झालेली असावी.
• तटस्थ दृष्टिकोन - लेखन पूर्णपणे निष्पक्ष आणि तटस्थ असावे. कोणत्याही
एका विचारधारेची बाजू घेऊ नये.
• स्वतंत्र स्रोत- स्रोत त्या विषयाशी संबंधित नसावा.
इतर महत्त्वाच्या अटी
• उल्लेखनीयता - प्रसंगाला किंवा घटनेला ऐतिहासिक किंवा सामाजिक महत्त्व
असावे.
रोजच्या किरकोळ बातम्या विकिपीडियावर चालत नाहीत.
• हितसंबंधांचा संघर्ष- स्वतःबद्दल किंवा स्वतःच्या कंपनीबद्दल लिहू
नये.
• जिवंत व्यक्तींचे चरित्र - जिवंत व्यक्तीबद्दल लिहिताना अत्यंत कडक
नियम आहेत.
या अटींचे पालन न झाल्यास तो मजकूर ताबडतोब हटविल्या जातो.